मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास
(विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांतर्गत
जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विषयात पीएच्.डी. पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधनपूर्व आराखडा

संशोधक

जोंधळे गिरीश नागेश

मार्गदर्शक

प्रो. डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर 2024

मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास
(विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे)

१. प्रस्तावना:

"मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास (विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे)" या विषयावरील संशोधन अभ्यासात भारतीय संविधानातील मूलभूत हक्क कायदेशीर जोपासली जातात कि नाही यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. यासोबतच नागरिक पत्रकारितेची संकल्पना कशी अस्तित्वात आली, आजघडीला तिचे स्वरूप कसे विकसित झाले आहे आणि नागरिक पत्रकारितेचे भविष्य कसे असू शकेल या प्रमुख मुद्यांवर अभ्यास करून संशोधनात्मक मांडणी केली जाणार आहे. मराठी वृत्तपत्रातून नागरिक पत्रकारिते महत्व विशद करणारा, तसेच नागरिक पत्रकारिता हि सामाजिक, नैतिक मूल्ये जोपासते का? ते किती आवश्यक आहे हे सांगून नागरिक पत्रकारितेबद्दलची विवेचनात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न या संशोधनात असणार आहे. पत्रकारितेत येऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकास तसेच भारतीय नागरिकांना हे संशोधन मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास वाटतो.

२. संशोधन विषयाचे महत्व:

सदरील संशोधन विषय हा नागरिक पत्रिकारितेची संकल्पना आणि स्वरूप विशद करणारा असून नागरिक पत्रिकारितेच्या पुढील भविष्यावर प्रकाश टाकणारा असणार आहे. या संशोधन अभ्यासामुळे सामान्य जनास कायदेशीर किंवा घटनेनुसार दिलेल्या मूलभूत हक्कातच नागरिक पत्रकारितेचे अधिकार दडलेले आहेत हे उमजेल. समाज माध्यमांवरील अर्थहीन किंवा दिशाहीन पत्रकारितेस या संशोधनामुळे नागरिक पत्रकारितेची नीतिमूल्ये आणि सामाजिक जवाबदाऱ्या समजतील. आर्टिफिसिअल इंटेलिजन्स च्या साधक बाधक बाबींचे महत्व लक्ष्यात घेऊन समाजात जागरूकता निर्माण व्हावी आणि प्रत्येक नागरिक पत्रकाराने नैतिक मूल्ये जोपासून, सामाजिकभान राखून आपली मते किंवा सामाजिक प्रश्न मांडावीत. या संशोधनामागे इत्यादी प्रमुख उद्देश असल्याने

"मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास (विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे)" या विषयास अधिक महत्व प्राप्त झाले आहे.

३. संशोधन पूर्व अभ्यास:

"मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास (विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे)" हा संशोधन विषय निवडण्यापूर्वी शोधगंगा, रिसर्च गेट व गुगल स्कॉलर या वेबसाईड्सवर सदरील विषय नसल्याची खातरजमा करण्यात आली. या विषयास अनुसरून प्रसिद्ध साहित्य, लेख, शोधप्रबंध यांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार नागरिक पत्रकारितेची वैशिट्ये, त्याचे सोर्सेस, उद्दीष्टे, नागरिक पत्रकारितेतील अडचणी, फेक न्यूज, समाज माध्यमांवरील नागरिक पत्रकारिता या मुद्यांवर यापूर्वी संशोधन अभ्यास झाल्याचे आढळले. मराठी वृत्तपत्रातील वाचकांची पत्रे हि नागरिक पत्रकारितेचेच एक माध्यम असून या मुद्यांवर अद्याप संशोधन अभ्यास झाले नसल्याचे आढळले म्हणून आंतर विद्याशाखेअंतर्गत माध्यमशास्त्रातील पीएच.डी. साठी "मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास (विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे)" हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

४. संशोधन विषय व्याप्ती आणि मर्यादा:

१. सदरील संशोधन अभ्यासात मराठी वृत्तपत्र माध्यमाच्या दैनिक लोकसत्ता व दैनिक महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्र माध्यमातून प्रसिद्ध होणाऱ्या वाचकांच्या पत्रांचा अभ्यास केला जाणार आहे.

२. या संशोधन कार्यात दैनिक लोकसत्ता व दैनिक महाराष्ट्र टाइम्स च्या वाचकवर्गाची ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने मुलाखत किंवा प्रश्नावली स्वरूपात मते जाणून घेण्यात येणार आहेत.

३. या संशोधन कार्यात दैनिक लोकसत्ता व दैनिक महाराष्ट्र टाइम्स च्या संपादक, उपसंपादक आणि वार्ताहर आणि सदरील वृत्तपत्रांचे वाचक यांची ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने मुलाखत किंवा प्रश्नावली स्वरूपात मते जाणून घेण्यात येणार आहेत.

४. या संशोधन अभ्यासास कालमर्यादा असल्याने फक्त १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या काळातील दैनिक लोकसत्ता व दैनिक महाराष्ट्र टाइम्स च्या प्रकाशित आवृत्या मधील वाचकांच्या पत्रांचा अभ्यास केला जाणार आहे.

५. संशोधन विषयाची उद्दीष्टे:

१. मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा उगम, इतिहास आणि विकास सांगणे.

२. नागरिक पत्रकारितेचा अर्थ, व्याख्या स्पष्ट करून महत्व सांगणे.

३. दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांच्या पत्रांचा विषय, स्वरूप आणि व्याप्तीचा अभ्यास करणे.

४. दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांच्या पत्रांचे वर्गीकरण आणि आशय विश्लेषण करणे.

५. दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांच्या पत्रांबद्दल वाचकांचे सर्वेक्षण करणे.

६. दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स च्या संपादक, उपसंपादक, वार्ताहर तसेच त्यांचा वाचकवर्ग यांच्या मुलाखतींची चिकित्सा करणे.

६. संशोधन गृहीतके:

१. मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेस लोकशाहीत अधिक महत्व आहे.

२. नागरिक पत्रकारितेबद्दल नागरिक अनभिज्ञ असून ते नीतिमूल्याबद्दल अज्ञानी आहेत.

३. नागरिक पत्रकारितेमुळे सामान्य व्यक्तीची विचार करण्याची भूमिका बदलते.

४. मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेमुळे पत्रकारिता सर्वव्यापी होईल.

५. नागरिक पत्रकारितेमुळे प्रत्येक भारतीय नागरिकाला पत्रकारितेचा हक्क मिळालेला आहे.

७. संशोधन पद्धती:

संशोधन हे तथ्यांवर आधारित असते. त्या तथ्यांना पडताळून पाहण्याकरिता वैज्ञानिक संशोधन पद्धतीचा अवलंब करावा लागतो. या संशोधन विषयासाठीसुद्धा संशोधन पद्धती निवडतांना संशोधन विषयातील तथ्ये आणि उद्दीष्टे लक्ष्यात ठेऊनच मिश्र संशोधन पद्धतीचा (Mixed Method Approach) वापर केला जाणार आहे. यात प्रामुख्याने गुणात्मक (Qualitative), मात्रात्मक (Quantitative) च्या मदतीने तथ्ये व उद्दीष्टे पडताळून संशोधन निष्कर्ष काढण्यात येणार आहेत.

नागरिक पत्रकारितेचा सखोल अभ्यास करण्याकरिता त्याची संकल्पना, स्वरूप आणि भविष्य हे समजावून घेणे महत्वाचे ठरते. तसेच त्यातील आव्हाने आणि संधीचाही अभ्यास व्हायला हवा. सामान्य लोकांमध्ये नागरिक पत्रकारितेच्या जागरूकतेचे प्रमाण जाणून घेण्यासाठी मिश्र संशोधन पद्धती महत्वाची ठरेल, असा विश्वास आहे.

८. तथ्य संकलन:

"मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास (विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे)" या संशोधन अभ्यासात तथ्य संकलन हा अतिशय महत्वाचा टप्पा आहे. संशोधन अधिक प्रभावी, वैध आणि विश्वासार्ह होण्याकरिता तथ्य संकलन महत्वाचे आहे.

तथ्य संकलनाचे प्रमुख दोन प्रकार आहेत. १) प्राथमिक स्रोत आणि २) द्वितीय स्रोत

१) प्राथमिक स्रोत : या संशोधन अभ्यासाकरिता दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांच्या पत्रांचे प्रत्यक्ष निरीक्षणात्मक परीक्षण करण्यात येणार आहे.

२) द्वितीयक स्रोत : या मध्ये १) व्यक्तिगत प्रलेख आणि २) सार्वजनिक प्रलेख यांचा समावेश होतो.

   १) व्यक्तिगत प्रलेखात नागरिक पत्रकारांच्या मुलाखत व गटचर्चा याद्वारे तथ्ये गोळा करण्यात येणार आहेत.

   २) सार्वजनिक प्रलेखात सदरील संशोधन विषयासंबंधी प्रकाशित पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, शासकीय अहवाल, संशोधन अहवाल, शासकीय रेकॉर्ड, आंतरराष्ट्रीय अहवाल, आयोग परिषदा व समितीचे अहवाल, संशोधन संस्था या माध्यमांद्वारे माहिती गोळा करण्यात येणार आहे.

   ३) संबंधित दैनिकांचे संपादकीय मंडळ तसेच वाचक वर्ग यांच्या सहेतुक मुलाखती व प्रश्नवाली स्वरूपात तत्थे गोळा केली जाणार आहेत.

९. आशय विश्लेषण:

मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास (विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे) या संशोधन विषयाचा सार किंवा वरील तथ्ये दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्र माध्यमातील माहितीच्या संकलनातून आलेल्या माहितीचे विश्लेषण या आशय विश्लेषणाद्वारे केल्या जाणार आहे. त्या करिता शेकडेवारी पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे

आणि एम एस एक्सेल या सॉफ्टवेअर चा उपयोग घेऊन चार्ट, ग्राफ या पद्धतीने मांडणी केली जाणार आहे.

१०. सूचना आणि शिफारशी:

"मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेचा अभ्यास (विशेष संदर्भ : दैनिक लोकसत्ता, दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांची पत्रे)" सदरील संशोधनाअंती शासनास तसेच नागरिक पत्रकारांना काही मार्गदर्शक सूचना सुचविण्यात येतील. नागरिक पत्रकारितेत डिजिटल माध्यमाचा वापर करण्यासंबंधीत कायदेशीर चौकट निर्माण करण्याकरिता महत्वाच्या सूचना मांडण्यात येतील. तसेच सदरील संशोधन विषयास भौगोलिक व कालिक मर्यादा असल्याने पुढील संशोधकास या पुढील संशोधनाकरिता अधिक विषय सुचविण्यात येतील. कारण नैसर्गिक आणि वैज्ञानिक दृष्ट्या बदल सातत्याने होत असतो. त्यामुळेच रिसर्च म्हणजे संशोधनाचे महत्व अधिक आहे.

११. प्रकरण योजना:

१. मराठी वृत्तपत्रातील नागरिक पत्रकारितेची संकल्पना आणि महत्व

२. संशोधन पद्धती

३. दैनिक लोकसत्ता मधील वाचकांच्या पत्रांच्या विविध विषयांचा अभ्यास

४. दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांच्या पत्रांच्या विविध विषयांचा अभ्यास

५. दैनिक लोकसत्ता मधील वाचकांच्या पत्रांचे आशय विश्लेषण

६. दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील वाचकांच्या पत्रांचे आशय विश्लेषण

७. सर्वेक्षण अहवाल

८. मुलाखतींची चिकित्सा

९. निष्कर्ष, सूचना आणि समारोप

१२. संदर्भ ग्रंथ सूची:

१) आगलावे डॉ.प्रदीप, “संशोधन पद्धती व तंत्रे”, विद्या प्रकाशन, नागपूर.

२) भांडारकर पु.ल., “सामाजिक संशोधन पद्धती”, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.

३) Mcquil Denis, “Mass Communication Theory”.

४) https://legislative.gov.in/constitution-of-india/

५) https://mib.gov.in/

६) https://pib.gov.in/indexd.aspx?reg=3&lang=1

७) http://dayanitasingh.net/about-2/

८) https://www.masrat-zahra.com/

९) SOONI TARAPOREVALA – Photographer : Screen Writer

१०) India’s first woman photojournalist, a chronicler of history – Indian Express

१३. परिशिष्टे:

- प्रश्नावली /मुलाखतीचा नमुना
- आकडेवारी, चार्ट्स, डायग्राम्स, फोटोग्राफ्स

मार्गदर्शक

प्रो.डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे
DR.RAMANAND VYAVAHARE
Professor & Research Guide
Dept. of Journalism & Mass Communication
Shri Shivaji College
PARBHANI

संशोधक

जोंधळे गिरीश नागेश